**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** पारोळा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0009 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**09/01/2026 04:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 08/01/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/01/2026

**Time From (वेळेपासून):** 17:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/01/2026 **Time (वेळ):** 04:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/01/2026 04:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

ईशान्य, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** चोरवड गावातील श्री आस्था अमतत

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रशांत चिमणराव भरते

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रत,पारोळा ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रत,पारोळा ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888892478

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भाऊसाहेब गोरख पाटील | | | 1. वाघरे ता पारोळा जि जळगांव, पारोळा ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद लिहुन देतो की,मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे मागील ०६ महीन्यापासुन पोलीस उप अधीक्षक या पदावर कार्यरत आहे.
दिनांक ०७/०१/२०२६ रोजी तक्रारदार श्री.अनिल रामबंद्र राठोड, व्यवसाय शेती,रा.मु.पोपट नगर,पो.चोरवड ता. पारोळा, जि. जळगाव यांनी फोनद्वारे आमच्याशी संपर्क साधुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेसंबंधी तकार असल्याचे सांगुन आपण पारोळा येथे येवुन कारवाई करणेबाबत विनंती केली. त्याप्रमाणे आम्ही दिनांक ०८/०१/२०२६ रोजी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नंदुरबार यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन पंच उपलब्ध करुन घेतले.
त्यानंतर आम्ही आमचे स्टाफ पोलीस अंमलदार पोहवा/विजय ठाकरे, पोहवा/नरेंद्र पाटील,पोना/हेमंतकुमार महाले यांना सुचना देवुन सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या साहित्यासह तसेच दोन्ही पंच असे खाजगी वाहन क्रमांक एम. एच.३९ अ. क्यु. २५५६ ने ला.प्र.वि., नंदुरबार येथुन निजामपुर धुळे-पारोळा या मार्गाने चोरवड येथील दत्त मंदीराचे बाजूस असलेल्या पोलीस चौकी येथे पोहचलो. सदर ठिकाणी एक इसम उपस्थित होते. त्यास आम्ही खाजगी वाहनात बसवुन घेतले. त्यानंतर आम्ही त्यांस नाव,पत्ता विचारुन खात्री केली असता तो तकारदार अनिल राठोड असल्याची खात्री झाली त्यानंतर आम्ही, तकारदार अनिल राठोड यांना पंच, सापळा पथकातील अंमलदार यांचे समक्ष त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री. अनिल रामचंद्र राठोड,वय ३२ वर्षे, व्यवसाय शेती, रा.मु.पोपट नगर, पो.चोरवड ता.पारोळा,जि. जळगाव असे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन, त्यांची पंच व सापळा पथकातील अंमलदार यांची ओळख करुन देवुन पुढील सापळा कारवाई सुरु केली.
आम्ही तक्रारदार अनिल रामचंद्र राठोड यांना त्यांचे तकारीबाबत सापळा पथकासमक्ष विचारपुस करता त्यांनी सांगितले की, त्याची पत्नी नामे निता अनिल राठोड हिचे नावे मौजे पोपट नगर शिवारात शेत गट नं. ११६, क्षेत्र १.२९ हे. आर अशी शेती आहे. दिनांक २१/०६/२०२५ रोजी त्यांनी त्यांचे पत्नीचे नावे असलेल्या वरील शेतात मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत सौर कृषी पंप बसविण्यासाठी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीस ऑनलाईन अर्ज केला होता त्याचा लाभार्थी क्रमांक MT-4397000604868 असा प्राप्त झाला होता, त्यावेळी त्यांनी सौर कृषी पंपासाठी लागणारी शासनाची फी ३२,०७५/-रुपये ऑनलाईन भरलेली होती व त्याबाबत त्यांना ऑनलाईन पैसे भरल्याची पावती देखील मिळाली होती.
सौर कृषी पंप बसविण्यासाठी विद्युत वितरण कंपनी मार्फत अगोदर शेतातील विहीरचे सर्वेक्षण केले जाते, सर्वेक्षणासाठी तकारदारास दिनांक २०/०९/२०२५ हि तारीख देण्यात आली होती. सदर दिवशी महावितरण प्रतिनिधी व पुरवठादार प्रतिनिधी यांचेसोबत नियोजीत दिवशी संयुक्त सर्वेक्षण पुर्ण करण्यास उपस्थित राहणेबाबत त्यास दिनांक १९/०९/२०२५ रोजी मोबाईलवर मॅसेज प्राप्त झाला होता.
दिनांक २०/०९/२०२५ रोजी त्यांनी महावितरण प्रतिनिधी यांची वाट पाहीली परंतु सदर दिवशी महावितरणाचे कोणतेही प्रतिनिधी त्यांचे शेतात सर्वेक्षणासाठी आले नाही. त्यानंतर आठ दिवसांनी तक्रारदाराने गावात चौकशी केली की, शेतात सौर कृषी पंपासाठी सर्वेक्षणाचे काम कोण करतो, त्यावेळी त्यांना समजले की, त्यांचे पोपट नगर शिवारातील शेतातील सर्वेक्षणाचे काम वायरमन भाऊसाहेब पाटील यांना सोपविण्यात आले आहे. म्हणुन तक्रारदाराने वायरमन भाऊसाहेब पाटील यांचा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन दिनांक २८/०९/२०२५ पासुन वेळोवळी त्यांचेशी मोबाईलवरुन संपर्क केला होता,प्रत्येक वेळी त्यांनी तक्रारदारास ते ज्यावेळी त्यांचे शेतात येतील त्यावेळी फोन करेल व त्यांचे शेतात येवुन सर्वेक्षण करेल असे सांगत होते. मात्र पुढील तीन महिने त्यांनी सर्वेक्षण केले नाही व काही ना काही कारण सांगुन तकारदारास टाळत होते.
दिनांक ०४/०१/२०२६ रोजी तकारदाराने पुन्हा वायरमन भाऊसाहेब पाटील यांना फोन केला व त्यांना सर्वेक्षणासाठी शेतात येणेबाबत विनंती केली होती,त्यावेळी त्यांनी तक्रारदाराकडुन शेतातील सर्वेक्षण करणेसाठी

१५००/- रुपयांची मागणी केली होती.
यानंतर तकारदाराने वायरमन भाऊसाहेब पाटील हे मागीत असलेले १५००/-रुपये याबाबत माहिती घेतली असता ती कोणतीही शासकीय फी नसुन लाचच आहे, अशी त्यांची खात्री झाल्याने तसेच त्यांना वायरमन भाउसाहेब पाटील यास लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने, त्यांनी काल दिनांक ०७/०१/२०२६ रोजी मला फोनव्दारे संपर्क करुन हकीकत सांगीतली व कारवाई करणेसाठी पारोळा येथे येणे बाबत विनंती केली होती.
त्यानुसार आज दिनांक ०८/०१/२०२६ रोजी मी व माझेसोबत अॅन्टी करप्शन ब्यूरो, नंदुरबारचा स्टाफ व दोन पंच असे तक्रारदाराने सांगतलेल्या ठिकाणी चोरवड गावातील चोरवड पोलीस चौकीजवळ आलो. त्यावेळी तकारदाराने दोन पंचासमक्ष वरील प्रमाणे लेखी तक्रार लिहुन दिली आहे.
सदर तक्रारीबाबत तकारदाराने त्याची पत्नी सौ.निता अनिल राठोड हिवेशी यापुर्वी चर्चा केली असता तिने तक्रारदारास नमुद कामासंदर्भात सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचा अधिकार दिलेला आहे. तरी तक्रारदाराने त्याचेकडून १५००/-रुपयांची लाच मागणारे वायरमन भाऊसाहेब पाटील यांचेवर कायदेशीर कारवाई करावी बाबतची तक्रार स्वः हस्ताक्षरात सविस्तर लिहुन दिली होती."त्यावर तक्रारदार अनिल राठोड, आम्ही तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या होत्या.
सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचमागणी पडताळणी कारवाई करावयाची असल्याने आम्ही तकारदार अनिल राठोड व पंच क.१ श्री.अतुल पंडीत यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेप्रमाणे पोहवा/विजय ठाकरे यांनी नविन मेमरीकार्ड काढुन ते डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकुन ते सुरु करुन तकारदार अनिल राठोड यांचे शर्टचे आत बनियनला बाधुन तकारदार यांचेकडील मोटार सायकलने १७.०० वा. रवाना केले होते.
तकारदार अनिल राठोड व पंच क.१ श्री अतुल पंडीत हे सापळा पथकाजवळ परत आल्यानंतर पोहवा/विजय ठाकरे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केले. आम्ही पंच क.१ व तकारदार यांना घडलेली हकीकत विचारली असता त्यांनी ती कथन केली. त्यानंतर आम्ही सापळा पथकासमक्ष तकारदार व वायरमन भाऊसाहेब पाटील यांचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले सदर संभाषणामध्ये वायरमन भाऊसाहेब पाटील यांनी तक्रारदार यांना हाताने इशारा करुन पैसे मागितले तेव्हा तकारदार अनिल राठोड यांनी त्यास विचारले की, किती दयायचे? त्यावर वायरमन भाउसाहेब पाटील यांनी सांगितले की,तुला जेवढे दयायचे आहे ते देवुन टाक ना लवकर, त्यावेळी दोघांमध्ये देण्या घेण्याबाबत चर्चा होवुन वायरमन भाऊसाहेब पाटील यांनी पंधराशे देवुन टाक, असे सांगितले, तेव्हा तकारदार अनिल राठोड यांनी सांगितले की, पंधराशे नाही, पाचशे रुपये त्यावेळी वायरमन भाऊसाहेब पाटील यांनी सांगितले की,नाही होणार, तुम्ही ना तुमचे काम करुन देखील असे करतात ना... तेव्हा तकारदार यांनी सांगितले की, किती देवु ते सांग,शेवटी वायरमन भाऊसाहेब पाटील यांनी सांगितले की, हजार रुपये देवुन टाक, तेव्हा तकारदार यांनी सांगितले की, पाचशेमध्ये नाही होणार का, तेव्हा वायरमन भाऊसाहेब पाटील यांनी नाही असे म्हणून तक्रारदार यांचेकडुन १०००/-रूपये स्विकारण्यास संमती दर्शवुन लाचमागणी केल्याबाबत खात्री झाली. यावरून वायरमन भाऊसाहेब पाटील यांनी तक्रारदार अनिल राठोड यांचेकडे त्यांचे सौर कृक्षी पंप बसविण्यासाठी शेतातील विहीरीचे सर्वेक्षणासाठी प्रथम १५००/-रूपये लाचेची मागणी करुन व तडजोडीअंती १०००/-रूपये लाचेची मागणी केल्याबाबत आमची व सापळापथकाची खात्री झाली होती. तसा लाच मागणीबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर आम्ही तक्रारदार अनिल राठोड यांना वायरमन भाऊसाहेब पाटील यांचे मागणीप्रमाणे १०००/-रुपये लाच रक्कम देण्यासाठी हजर करण्यास सांगीतले. त्यांनी लाच म्हणुन देण्याकरीता त्यांचे घर खर्चातील १०००/-रुपये त्यात ५००/-रुपये दराच्या ०२ चलनी नोटा हजर केल्या. आमचे सुचनेप्रमाणे पंच क. २ धवल पेटकर यांनी सदर नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेतले. त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पोहवा/नरेंद्र पाटील यांनी सदर लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदर नोटा तक्रारदार यांचे शर्टचे डाव्या बाजुकडील पुढील खिशात व्यवस्थित ठेवुन दिल्या.
त्यानंतर आम्ही तक्रारदार अनिल राठोड व पंच क्र.१ श्री.अतुल पंडीत यांचेसह लाचेची रक्कम घेवुन चोरवड गावातील श्री आस्था अमृततुल्य येथे पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा कारवाई संदर्भात आम्ही तक्रारदार यांचेसह पंच तसेच सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोहवा/विजय ठाकरे यांनी आमचे सुचनेवरून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून तकारदार अनिल राठोड यांचे शर्टचे आत बनियनला लावुन देवुन त्यांना चोरवड गावातील पोलीस चौकी जवळुन चोरवड गावातील श्री आस्था अमृततुल्य येथे तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने रवाना केले व आम्ही सापळा पथकातील सदस्य असे तक्रारदार यांचे मोटार सायकलच्या मागोमाग रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार अनिल राठोड व पंच क्र.१ अतुल पंडीत असे चोरवड गावातील श्री आस्था अमृततुल्य येथे पोहचले. त्यानंतर आम्ही आमचे खाजगी वाहन सदर

ठिकाणापासुन काही अंतरावर थांबवुन सदर चोरवड गावातील श्री आस्था अमृततुल्यचे आजुबाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबलो. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याबाबत १७.५७ वा. सापळा पथकास इशारा केला. तेव्हा सदर ठिकाणी आम्ही व सापळा पथकाने वायरमन भाऊसाहेब पाटील यांना ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच पोहवा/विजय ठाकरे यांनी तक्रारदार यांचेकडे असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या वायरमन भाऊसाहेब पाटील यांस त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नांव भाऊसाहेब गोरख पाटील वय ३३ वर्षे, व्यवसाय नोकरी, वरिष्ठ तंत्रज्ञ, मंगरुळ कक्ष, मरा.वि.वि.क.मर्या. पारोळा ता. पारोळा जि. जळगांव रा. वाघरे ता. पारोळा जि. जळगांव असे सांगितले. तरी दिनांक ०८.०१.२०२६ रोजी लोकसेवक भाऊसाहेब गोरख पाटील, वय ३३ वर्षे,व्यवसाय नोकरी, वरिष्ठ तंत्रज्ञ, मंगरुळ कक्ष, म.रा.वि.वि.क. मर्या. पारोळा ता. पारोळा जि.जळगांव रा.वाघरे ता.पारोळा जि.जळगांव यांनी तकारदार अनिल राठोड यांच्या पत्नी नामे निता अनिल राठोड हिचे नावे मौजे पोपट नगर शिवारात शेत गट नं. ११६, क्षेत्र १.२९ हे. आर या शेतातील मागेल त्याला सौर कृषी पंप या योजने अंतर्गतत सौर कृषी पंपासाठी सर्वेक्षणाचे काम करुन देण्यासाठी तकारदार अनिल राठोड यांचेकडे प्रथम १५००/- रूपये व तडजोडीअंती १०००/-रूपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम भाऊसाहेब गोरख पाटील, वरिष्ठ तंत्रज्ञ, मंगरुळ कक्ष, मरा.वि.वि.क. मर्या. पारोळा ता. पारोळा जि. जळगांव यांनी १७.५७ वाजेच्या सुमारास पंच क्र. १ यांचेसमक्ष श्री आस्था अमृततुल्य समोर, चोरवड, ता.पारोळा, जि.जळगांव येथे स्विकारली,म्हणुन त्यांचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ प्रमाणे फिर्याद आहे..वगैरे मजकूरच्या फिर्यादी वरून गुन्हा रजिस्टरी दाखल करून प्रथम खबरी रिपोर्ट अधिकार असणारे मॅजि. सो यांच्या कर्डेस पाठिवले मा. वरिष्ठांना बिनंतारी संदेशाव्दारे कळविण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक स्मिता नवघरेनेमणुक अँण्टी करप्शन ब्युरो युनिट जळगाव हे करीत आहे.सोबत टंकलिखित फिर्याद जोडलेली आहे.
दाखल अंमलदार - पोहे/2052 प्रकाश ठाकुर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Yogesh Janardhan Mahajan
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 17101000599MYJ
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
पारोळा पोलीस ठाणे
जि. जळगांव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SACHIN SITARAM SA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPSSSM7904